सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Email ID:-directoriayruralhousing@gmail.com
Website:- https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./राव्यक-ग्रागृ/लेखा(रायो)/ ८७७ /२०२३-२०२४ दि:२९/०६/२०२३

**प्रति,**
**प्रकल्प संचालक,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व).**

विषय :- प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलाचे प्रलंबित हप्ते वितरीत करण्याबावत दि. २३/०६/२०२३ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र./राव्यक-ग्रागृ/लेखा(रायो)/VC/८२७/२०२३ दि. २२.०६.२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा तसेच लाभार्थ्यांना प्रलंबित घरकुल हप्ते वितरीत करण्याबाबत आढावा घेण्यासाठी शुक्रवार **दि. २३/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती स्तरावरील सहायक लेखा अधिकारी यांची व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

**अपर्णा पाटणे**
**सहायक संचालक (लेखा)**
**राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

प्रत :-
कार्यकारी अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना माहितीस्तव पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner

# प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलाचे प्रलंबित हप्ते वितरीत करण्याबाबत दि. २३/०६/२०२३ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना प्रलंबित घरकुल हप्ते वितरीत करण्याबाबत आढावा घेण्यासाठी शुक्रवार **दि. २३/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती स्तरावरील सहायक लेखा अधिकारी यांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | पदनाम | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १ | सहायक संचालक (लेखा) | राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, मुंबई उपस्थित |
| २ | सहायक लेखा अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | ठाणे, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद, अमरावती, वाशिम, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यातील सहायक लेखा अधिकारी अनुपस्थित व वाकी इतर उपस्थित. |

**विषय क्र. १) प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांचे मानधनाबाबत :-**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत कार्यरत असलेले ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांच्या मानधनाबाबत सद्यस्थितीचा सहायक संचालक (लेखा) यांनी आढावा घेतला. आपल्या कार्यालयाकडील पत्र क्र. रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/३३१५/२०२३ दि. १३.०३.२०२३ चे पत्रान्वये ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांचे एकुण मानधनापैकी ५० टक्के मानधन जिल्हास्तरावरुन तसेच उर्वरित ५० टक्के मानधन सी.एस.सी. मार्फत अदा करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. काही जिल्हयांनी ५० टक्के मानधन जिल्हास्तरावरुन अदा केलेले आहेत (रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर व चंद्रपूर) व काही जिल्ह्यांनी अपुरा निधी अभावी मानधन अदा केलेले नाही. सद्यस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांचे मानधन पुढील सुधारित आदेश होईपर्यंत अदा न करण्याबाबत सांगितले.

**विषय क्र. २) प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रलंबित हप्त्यांचा आढावा.**

सहायक संचालक (लेखा) यांनी सर्व जिल्ह्यांचा प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत जिल्हानिहाय लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रलंबित हप्त्यांचा आढावा घेण्यात आला. सदर आढावा हा ज्या जिल्ह्यांमध्ये घरकुलाचा पहिला हप्ता वितरण करणे सर्वात जास्त प्रलंबित आहे, त्यानुसार आढावा घेण्यात आला. मंजूरी मिळालेल्या घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण गट विकास अधिकारी व तालुकास्तरावरील सहायक लेखा अधिकारी यांना दि. ३० जुन २०२३ रोजीच्या आत करणेबाबतच्या सूचना जिल्हास्तरावरील सहायक लेखा अधिकारी व तालुका स्तरावरील सहाय्यक लेखा अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

Scanned by CamScanner

दि. २३.०६.२०२३ रोजी किती लाभार्थ्यांना हप्ते मंजूर केलेले आहे, ज्यांचे प्रदान अंतिम टप्प्यात आहे त्यांची माहिती बैठक संपताच कार्यालयास कळविण्यात यावी. पुढच्या बैठकीत वरीलपैकी किती FTO भरण्यात आले याचा आढावा घेण्यात येईल, अशा सूचना देण्यात आल्या.

उपरोक्त विषयांव्यतिरिक्त इतर अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत चर्चा करुन उपस्थित सर्वांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

अपर्णा पाटणे
सहायक संचालक (लेखा)
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

Scanned by CamScanner